ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172

Case No: CGRF/AZ/U/254/2009/88/ Date:-
To,

The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect of Smt. Jijabai Laxman Misal, N-2, C-48/03, Shangharsh Nagar, Mukundwadi, CIDCO, . Aurangabad. (Consumer No. 490011104395)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Smt. Jijabai Laxman Misal, N-2, C-48/03, Shangharsh Nagar, Mukundwadi, CIDCO,.Aurangabad.

You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with. related documents.

The hearing in this matter is kept on 24/11/2009 at 11=30 Hrs.

Member/Secretary
CGR F (AZ),MSEDCL
Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :
Smt. Jijabai Laxman Misal,
N-2, C-48/03, Shangharsh Nagar,
Mukundwadi, CIDCO,
Aurangabad.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५४/२००९/८८**

**तक्रार दाखल दिनांक :- ०६/११/२००९**
**निकाल दिनांक :- ३०/१२/२००९**

**सौ.जिजाबाई लक्ष्मण मिसाळ,**
**सिडको एन २,संघर्षनगर,**
**रुम नंबर सी/४८/०३,मुकुदवाडी**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११००४३९५) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/११/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २४/११/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा घेतला असुन त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१११०४३९५ आहे.त्यांचा विद्युत पुरवठा वीज बिलाची थकबाकी रुपये ६३२० न भरल्यामुळे मार्च २००५ पासुन कायमचा खंडीत करण्यात आला होता.महावितरण कंपनीने वाणिज्य परीप्रत्रक ८३ दिनांक १५/०७/२००८ नुसार नवप्रकाश योजना जाहीर केल्यानंतर ग्राहकाने त्या योजने अंतर्गत विद्युत पुरवठा पुर्नजोडणीबाबत चिकलठाण उपविभाग येते अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्जानुसार नवप्रकाश योजने अंतर्गत वरिल परिपत्रकानुसार ५० टक्के थकीत बाकी भरण्याबाबत रुपये ३१६५ चे देयक देण्यात आले ग्राहकाने त्यांचा भरणा दिनांक २२/०८/२००८ रोजी केला व त्यानंतर कनिष्ठ अभियंता यांनी पुर्नजोडणी बाबत दिलेल्या कोटेनुसार रुपये ५७५ दिनांक २२/०८/२००८ रोजी भरलेत.त्यानंतर ग्राहकाचा वीज पुरवठा दिनांक २९/०८/२००८ रोजी जोडुन देण्यात आला. त्यानंतर महावितरण कंपनीतर्फे ग्राहकास प्रथम बिल माहे जानेवारी २००९ मध्ये अंदाजीत रक्कमेचे देण्यात आले त्याचा भरणा ग्राहकाने केला आहे.त्यानंतर फेब्रुवारी महीन्यात क्रेडीट बिल असल्यामुळे ग्राहकास देण्यात आले नाही व मार्च महीन्याचे देयक ग्राहकास मिळाले नाही. वीज बिल घेण्यासाठी महावितरण कंपनीचे चिकलठाण उपविभागीय कार्यालयात गेले असतांना त्यांना नवप्रकाश योजने अंतर्गत पुर्वी दिलेली सवलत रद्द करुन संपुर्ण देयक भरण्यास सांगण्यात आले. कनेक्शन जोडुन घेतांना वरील परिपत्रकाप्रमाणे रुपये ९०० भरणे अवश्यक आसतांना त्यांनी ५७५ रुपयाचा भरणा केल्यामुळे त्यांची सवलत काढुन घेण्यात आल्याचे महावितरण कंपनीतर्फे

सांगण्यात आले. ग्राहकाच्या अर्जानुसार त्यांना महावितरणतर्फे देण्यात आलेले कोटेशन (रुपये ५७५) त्यांनी भरलेले आहेत.त्यांना जर ९०० रुपयाचे कोटेशन दिले असते तर ते त्यांनी भरले असते. त्यामुळे वरील प्रकरणात त्यांचा दोष नसतांना महवितरण कंपनीने नवप्रकाश योजनेचा लाभ मिळण्यापासुन त्यांना वचित केल्यामुळे त्यांनी प्रथम महावितरणचे अंतर्गत ग्राहक निवारण कक्षाकडे दिनांक ०५/०८/२००९ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत ग्राहक कक्षाने त्यांची तक्रार फेटाळुन लावल्यामुळे त्यांनी मंचाकडे अपिल दाखल केले आहे.

२) दिनांक २४/११/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर, श्री वायकोस उपकार्यकारी अभियंता चिकलठाणा व वीज ग्राहक सौ.जिजाबाई मिसाळ हे उपस्थित होते.ग्राहकाने वरील प्रमाणे त्यांची तक्रार कथन केली नोडल अधिकारी यांनी त्यांचा अर्ज सादर करतांना सांगीतले की,नवप्रकाश योजने नुसार वीज ग्राहकाने ५०० रुपये जोडणी आकार व ४०० रुपये अनामत रक्कम असे एकुण ९०० रुपये भरणे अवश्यक होते परंतु कनिष्ठ अभियंता यांनी त्यांना चुकीने ५७५ रुपयाचे कोटेशन दिले.तसेच योजने नुसार ग्राहकाने कनेक्शन घेतल्यानंतर एक वर्षाच्या कालावधी पर्यंत नियमीतपणे वीज बिल भरणे अवश्यक असतांना ग्राहकाने माहे मार्च २००९ चे देयक चा भरणा केलेला नाही त्यामुळे त्यांना नवप्रकाश योजने अंतर्गत देण्यात आलेली ५० टक्के थकीतबाकी सवलत रद्द करण्यात आली. नोडल अधिकारी यांनी नवप्रकाश योजनेच्या परीपत्रकाची प्रत ग्राहकाची सी.पी.एल.तसेच कनिष्ठ अभियंता विमान तळ वितरण केंद्र यांचे पत्र सादर केले.मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचा नवप्रकाश योजने अंतर्गत वीज पुरवठा बाबत चा अर्ज,वीज पुरवठा पुर्नजोडणी ची तारीख सादर करण्याचे सांगुन प्रकरण पुढील सुनावणीसाठी ची तारीख ०१/१२/२००९रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक ०१/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी श्री पी.आर.तौर,श्री ए.एन.सिद्दीकी सहाय्यक लेखापाल व वीज ग्राहक उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी मंचाने मागील तारखेस सांगीतलेली माहीती सादर केली नाही दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की,वीज ग्राहकाचा वीज पुरवठा ६३२० रुपये थकीत बाकी असल्यामुळे माहे २००५ पासुन कायमचा बंद होता.महावितरण कंपनीने वीज पुरवठा कायम स्वरुपी खंडीत करण्यात आलेल्या घरगुती वीज ग्राहकासाठी वीज पुरवठा पुर्ववत जोडुन देण्याकरीता नवप्रकाश योजना त्यांचे वाणिज्य परिपत्रक क्रमांक ८३ दिनांक १५/०७/२००८ नुसार कार्यन्वीत केली. वरील परिपत्रकातील कलम ३ व कलम ११ खालील प्रमाणे आहे.

'' ज्या घरगुती ग्राहकाची थकबाकी दिनांक ३१/०३/२००८ पर्यंत रुपये १०,००० पेक्षा कमी असेल अशा वीज ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्याकरीता त्याच्या थकबाकीची ५० टक्के रक्कम एक रक्कमी भरणे अवश्यक राहील.''

'' वीज पुरवठा पुर्ववत करण्यासाठी महावितरणच्या नियमाप्रमाणे चाचणी अहवाल सादर करणे बंधंनकारक असेल व ग्राहकांना नियमानुसार रुपये ५०० विद्युत जोडणी आकार व रुपये ४०० अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम वर नमुद केलेल्या रक्कमे व्यतीरिक्त आहे ''

वरील योजने नुसार ग्राहकाने वीज पुरवठा पुर्नजोडणी करीता अर्ज महावितरणचे उपकार्यकारी अभियंता चिकलठाणा यांच्याकडे केला. त्यांच्या अर्जानुसार उपकार्यकारी अभियंता यांनी नवप्रकाश योजने अंतर्गत ५० टक्के सवलतीचे वीज देयक रुपये ३१६५ दिनांक २२/०८/२००८ रोजी ग्राहकास दिले.ग्राहकाने त्याचा भरणा त्याच दिवशी केल्यानंतर उपकार्यकारी अभियंता यांनी त्यांचे कनिष्ठ अभियंता यांना नवप्रकाश योजनेतील तरतुदीनुसार पुर्नजोडणी आकाराचे फर्म कोटेशन देण्याबाबत पत्र दिनांक २२/०८/२००८ रोजी दिले. कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहकास वरील परीपत्रकाप्रमाणे रुपये ५७५/- चे कोटेशन दिनांक २२/०८/२००८ रोजी ग्राहकास दिले. वरील

कोटेशन बाबत कनिष्ठ अभियंता यांनी ५००/- रुपये अनामत रक्कम व सर्वीस वायर उपलब्ध नसल्यामुळे ग्राहकाकडुन पुर्नजोडणी आकार न घेता फक्त १५ टक्के ओ,आर,सी, चार्चेस घेतले असल्याचे त्यांनी दिनांक २४/०९/२००९ च्या पत्रानुसार उपकार्यकारी अभियंता यांना कळविले आहे.वरील पैश्याचा भरणा केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांनी ग्राहकाचा वीज पुरवठा दिनांक २९/०८/२००८ रोजी पुर्नजोडणी करुन दिला.

ग्राहकाच्या सी.पी.एल.नुसार त्यांना प्रथम बिल माहे जानेवारी २००९ मध्ये सरासरी आकारणीनुसार १०० युनिटचे देण्यात आल्याचे दिसुन येते.परंतु त्या बिलामध्ये नवप्रकाश योजने नुसार देण्यात आलेल्या ५० टक्के सवलतीनुसार माफ झालेल्या देयकाची वजावट करण्यात आलेली नाही. परंतु ग्राहकाने महावितरणकडुन बिलावर सुधारणाकरुन भरले असल्याचे म्हटले आहे व त्यानंतर दर महा देण्यात आलेल्या बिलावर सुध्दा नवप्रकाश योजने अंतर्गत देण्यात येणा-या सवतीच्या रक्कमेची वजावट केल्याचे दिसुन येत नाही त्यामुळे ग्राहकाने वरील देयक भरले नाही.ग्राहकाने महावितरण कंपनीस सुधारीत बिल देण्याबाबत विनंती केल्याचे दिसुन येते परंतु ग्राहकाने माहे फेब्रुवारी व मार्च २००९ चे देयक न भरल्यामुळे नवप्रकाश योजनेच्या परीपत्रकातील अट क्रमांक ११ नुसार त्याची सवलत काढुन घेण्यात आल्याचे महावितरण कंपनीतर्फे सांगण्यात आले. वरील बाबतीत ग्राहकाने महावितरण कंपनीचे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे दिनांक ०५/०८/२००९ रोजी तक्रार दाखल केलेली आहे.कक्षाने ग्राहकाच्या तक्रारीबाबत दिनांक ०४/१०/२००९ रोजी निकाल देऊन ग्राहकाने परिपत्रकानुसार रुपये ९००/- ऐवजी ५७५/- रुपयाचा भरणा केला व माहे फेब्रुवारी व मार्च चे देयक न भरुन परीपत्रकातील अट क्रमांक ११ चे उंलघन केल्याचे कारण दाखवुन ग्राहकाची तक्रार खारीस केली.

वरील बाबतीत महावितरण कंपनीतर्फे सादर करण्यात आलेल्या जबाबामध्ये कनिष्ठ अभियंता यांनी चुकीने रुपये ९००/- ऐवजी रुपये ५७५/- चे कोटेशन दिले असल्याचे मान्य केले आहे.ग्राहकास जर नियाप्रमाणे रुपये ९००/- चे कोटेशन दिले असते तर त्याने ते भरले असते. तसेच वीज पुरवठा पुर्नजोडणी केल्यानंतर देण्यात आलेल्या देंयकामध्ये नवप्रकाश योजने नुसार मिळालेल्या ५० टक्के सवलतीच्या रक्कमेची वजावट न करता देयक ग्राहकास देण्यात आले व ग्राहकाने त्याबाबत तक्रार केल्यानंतरही सुधारीत बिल देण्यात आले नाही व त्यामुळे ग्राहकास बिलाचा भरणा केला नाही. वरील दोन्ही बाबतीत ग्राहकाचा दोष अढळुन येत नाही.त्यामुळे अंतर्गत ग्राहक तक्रार कक्षाने दिलेला निर्णय योग्य नसल्याचे व नवप्रकाश योजने अंतर्गत त्यांची काढुन घेतलेली सवलत त्यांना पुन्हा बहाल करणे योग्य होईल असे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास नवप्रकाश योजने अंतर्गत मिळणारी ५० टक्के थकीत बाकी सवलत रुपये ३१६५/- चे समायोजन त्यांच्या देयकातुन करुन सुधारीत देयक देण्यात यावे.

२) वरील देयकात कोणतेही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

३) वरीलप्रमाणे सुधारीत देयक दोन समान हप्त्यामध्ये भरण्याची सवलत ग्राहकास देण्यात येत आहे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| प्र. अ. सगणे | विलासचंद्र सु. काबरा | विष्णु अं. हंबिरे |
|---|---|---|
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |

२००९/८८

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२५४/२००९/८८/ दिनांक :-

प्रति,

सौ.जिजाबाई लक्ष्मण मिसाळ,
सिडको एन २,संघर्षनगर,
रुम नंबर सी/४८/०३,मुकुदवाडी
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१११०४३९५)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/**२५४/२००९/८८** )

आपण दिनांक ०६/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.